# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
कॅम्प- बुलडाणा
दि.०२.०७.२०२१.

**लोकसेवक पोहेकॉ/१७१९ शिवाजी कुंडलिक मोरे पो.स्टे.बुलडाणा शहर यांनी ३०००/-रुपये लाच रक्कम स्विकारल्याबाबत**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | लोकसेवक श्री. शिवाजी कुंडलिक मोरे वय ५४ वर्षे, पद- पोहेकॉ/१७१९, पो.स्टे.बुलडाणा शहर, जि.बुलडाणा |
| लाचेची रक्कम | ३०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार याचा मामाचा मुलगा याच्यावर दाखल असलेल्या गुन्हयात मदत करण्यासाठी लाचेची मागणी |
| सापळा अधिकारी | एन.बी.बो-हाडे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

थोडक्यात हकीकत-

यातील तक्रारदार यांनी दि.०२.०७.२०२१ रोजी तक्रार दिली की, त्यांच्या मामाचा मुलगा नामे शे.तौफीक शे.फारुक वय २० वर्षे रा.इंदीरा नगर बुलडाणा याच्यावर दाखल असलेल्या कलम ३२३,३९४ भा.दं.वि. चे गुन्हयात मदत करण्यासाठी ५०००/-रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर तक्रारीवरुन दि.०२.०७.२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील आलोसे यांनी तक्रारदारास ५०००/-रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती ३०००/-रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दि.०२.०७.२०२१ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा समोर सापळा लावला असता, सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष लाचेची रक्कम ३०००/-रुपये स्विकारली. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपी लोकसेवक यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कारवाई मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती,मा.श्री.अरुण सावंत अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, श्री. एस.व्ही.शेळके पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, अंमलदार पोहेकॉ नितील टवलारकर, पोना अरविंद राठोड, योगेश खोटे व चापोकॉ नाविद शेख यांनी केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम कडुन सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते कि, शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क करावा.

संपर्क-

दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३,
टोल फ्रि.नं.१०६४

कार्यालय पोलीस उपअधिक्षक अँटी करप्शन ब्युरो * वाशिम *

(एन.बी.बो-हाडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.